महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळ, पुणे ४११ ००४.

विषय– उच्च माध्यमिक प्रमाणपत्र (इ.१२वी) व माध्यमिक शालान्त प्रमाणपत्र (इ.१०वी) परीक्षा फेब्रु–मार्च २०२७ लेखी परीक्षा आयोजनाबाबत...

# प्र क ट न

---

महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळाच्या पुणे, नागपूर, छ.संभाजीनगर, मुंबई, कोल्हापूर, अमरावती, नाशिक, लातूर व कोकण या नऊ विभागीय मंडळामार्फत फेब्रु–मार्च २०२७ मध्ये घेण्यात येणाऱ्या उच्च माध्यमिक प्रमाणपत्र (इ.१२वी) व माध्यमिक शालान्त प्रमाणपत्र (इ.१०वी) लेखी, प्रात्यक्षिक, तोंडी व अंतर्गत मूल्यमापन परीक्षा खालील कालावधीत आयोजित करण्यात येणार आहेत.

| अ. क्र. | तपशील | उच्च माध्यमिक प्रमाणपत्र (इ.१२ वी) परीक्षा कालावधी | माध्यमिक शालान्त प्रमाणपत्र (इ.१०वी) परीक्षा कालावधी |
|---|---|---|---|
| १) | लेखी परीक्षा | सोमवार, दि. ०८ फेब्रुवारी, २०२७ ते मंगळवार, दि. १६ मार्च २०२७ | सोमवार, दि. १५ फेब्रुवारी,२०२७ ते गुरुवार, दि. ११ मार्च, २०२७ |
| २) | प्रात्यक्षिक, श्रेणी, तोंडी व अंतर्गत मूल्यमापन | बुधवार, दि. २० जानेवारी २०२७ ते शनिवार, ०६ फेब्रुवारी २०२७ | गुरुवार, दि. २८ जानेवारी २०२७ ते शनिवार, १३ फेब्रुवारी २०२७ |

शाळा / कनिष्ठ महाविद्यालय व विद्यार्थी यांना अभ्यासक्रमाचे नियोजन करण्याचे हेतूने तसेच विद्यार्थ्यांच्या मनावरील ताण कमी होण्याचे दृष्टीने फेब्रुवारी–मार्च २०२७ च्या प्रात्यक्षिक व लेखी परीक्षेच्या संभाव्य तारखा जाहीर करण्यात येत आहेत.

प्रात्यक्षिक परीक्षा, श्रेणी, तोंडी व अंतर्गत मूल्यमापन परीक्षा व लेखी परीक्षांचे विषयनिहाय सविस्तर वेळापत्रक स्वतंत्रपणे मंडळाच्या संकेतस्थळावर जाहीर करण्यात येईल.

उपरोक्त बाबत सर्व संबंधितांनी नोंद घ्यावी.

दिनांक : १७/०९/२०२६

(डॉ. दिपक माळी)
सचिव,
राज्यमंडळ, पुणे ४

जा.क्र./पु.वि.मं/उमा अ/ १७००
दि २५/०९/२०२६

प्रति,
प्राचार्य,
सर्व मान्यताप्राप्त कनिष्ठ महाविद्यालये,
जिल्हा- पुणे, अहिल्यानगर, सोलापूर

उपरोक्त राज्य मंडळ प्रकटनाच्या अनुषंगाने फेब्रु-मार्च २०२७ उच्च माध्यमिक प्रमाणपत्र. इ.१२ वी परीक्षा नमूद कालावधीत आयोजित करण्यात येणार आहे. सदरील प्रकटन महाविद्यालयाच्या सूचना फलकावर लावावे व विद्यार्थ्यांना आपल्या स्तरावरून अवगत करावे --

(डॉ.मीनाक्षी राऊत)
विभागीय सचिव.
पुणे विभागीय मंडळ, पुणे- ०४